नमो तस्स भगवतो अरहतो सम्मा–सम्बुद्धस्स ।

बुद्धधम्मातील पुनर्भव (पुनर्जन्म) सिद्धांत : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा दृष्टिकोन

७. मी लिहीतो आहे इथे लेख हा आणि गातो गिते ही
तुझे व्हावे साक्षात दर्शन, हीच करतो प्रार्थना
८. अखिल प्राणिमात्रासहित ह्या धन्यभूमित
होवो मला जन्म प्राप्त
भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म

पुनर्जन्म आहे किंवा नाही हा प्रश्न मानवी मनात संभ्रम निर्माण करणारा असल्यामुळे पुनर्जन्म सिद्धांताबद्दल शंका घेतली जाते. काही लोक पुनर्जन्मावर विश्वास ठेवतात कारण त्यांचा धर्म तसे शिकवतो आणि या पारंपारीक विश्वासाच्या वर्तुळातच ते या सिद्धांताला सिद्ध करण्याचा प्रयत्न करतात. तर या उलट, जे लोक स्वत:ला इहवादी, आधुनिक आणि बुद्धिवादी समजतात ते या सिद्धांतावर विश्वास ठेवण्यासाठी तयार नाहीत. त्यांच्या मते ही एक कल्पना असून दुबळ्यांची फसवणूक करण्याचे एक साधन आहे. असे असले तरी, जे लोक सम्मोहन शास्त्र (Hypnotism) आणि परातत्व–मनोविज्ञान–शास्त्राशी (Parapsychology) संबधीत असलेल्या क्षेत्रात कार्य करतात ते लोक या सिद्धांतावर विश्वास ठेवतात आणि पुर्वजन्मस्मरण (प्रतिगमन) उपचार पद्धती (Regression Therapy) व प्रत्यक्ष जीवंत माणसाचा पुरावा (Case Studies) दाखवून ते सिद्धही करून दाखवतात. ''आधुनिक काळात प्रसिद्ध मानसशास्त्रज्ञ प्रोफेसर इन स्टिवनसन, एम. डी. यांनी वैज्ञानिकदुष्ट्या सिद्ध केले की, हा सिद्धांत वास्तविक आणि सत्य आहे. कित्येक जीवंत माणसाचे पुरावे देऊन त्यांनी हे सिद्धही करुन दाखवले. यात मुले आणि मोठ्यांचा समावेश आहे ज्यांना त्यांचा पुर्वजन्म आठवला होता आणि संशोधनाअंती त्यांचे कथन सत्य असल्याचे प्रमाणित झालेले आहे. तर काहींना पुर्वजन्मस्मरण (प्रतिगमन) उपचार पद्धतीच्या माध्यमाने पुर्वजन्माचे स्मरण झालेले आहे. दिवसेंदिवस यात लोकांची आवड वाढू लागलेली आहे. आज या सिद्धांतावर फक्त विश्वासच ठेवण्याची गरज नाही तर जसे काही काळाआधी गुरुत्वाकर्षणाच्या सिद्धांताला सिद्ध केले गेले होते तसेच या सिद्धांताला वैज्ञानिकदृष्ट्या सिद्ध केले गेले आहे. आजपर्यंत लाखो लोक या सिद्धांतावर फक्त विश्वासच ठेवत होते पण नुकतेच हे सत्य असल्याचे शोधले गेले आहे.'' *(**Ref** - 30 Most Convincing Cases of Reincarnation, Trutz Hardo, In Introduction)*

आधुनिक भारतातील काही आंबेडकरवादी विचारवंत बुद्धधम्मात शिकवलेला पुनर्जन्माचा सिद्धांत अमान्य करतात आणि आपल्या मताच्या समर्थनासाठी बाबासाहेबांचे नाव समोर करतात. ते म्हणतात, "बाबासाहेबांनी हा सिद्धांत नाकारला म्हणून आम्ही सुद्धा नाकारतो कारण हा बुद्धधम्माचा भाग नसून हिंदूधर्माचा भाग आहे आणि ब्राह्मणांनी तो बुद्धधम्मात घुसडलेला आहे." हा दृष्टिकोण फारच पुर्वग्रहदुषित आणि चुकीचा आहे. जे लोक बाबासाहेबांचे नाव समोर करुन असा चुकीचा दृष्टिकोण मांडतात त्यांनी बुद्धधम्मातील सिद्धांत समजून घेण्यासाठी व असले चुकीचे समज मनातून काढून टाकण्यासाठी बाबासाहेबांचे हे मत लक्षात घेणे गरजेचे आहे. "... बाबासाहेब म्हणतात, फक्त पुनर्जन्म ही एकच बाब आहे जी वैज्ञानिक आधाराने अजूनही सिद्ध झालेली नाही परंतु पुनर्जन्मावर माझा पुर्ण विश्वास आहे. मी वैज्ञानिकांना हे सिद्ध करुन दाखवू शकतो की पुनर्जन्म सिद्धांत तर्कशुद्ध होता. माझ्या मते, हे जे तत्व (पाच उपादान स्कन्ध) आहेत त्यांचा जन्म होतो, एखाद्या माणसाचा नाही." *(**Ref** - Little Known Facet of Dr. Ambedkar, Nanak Chand Rattu, Page- 164. In his speech delivered at Buddha Vihar, New Delhi on 05/02/1956)*

पुनर्जन्म एखाद्या धर्माचा भाग नसून जीवनाचे वास्तव आहे आणि कार्य कारण भावाच्या वैश्विक नियमाचा तो एक अविभाज्य भाग आहे. बुद्धधम्मातील पुनर्जन्मावरील बाबासाहेबांचा दृष्टिकोण स्पष्ट करण्यासाठी खालील माहीती देण्यात येत आहे. त्याचा काळजीपुर्वक अभ्यास करून आपल्या मनातील गैरसमज दुर करुन घ्यावा जेणेकरून बाबासाहेबांचे नाव समोर करून काहीही बोलण्याचे टाळता येईल. खरे पाहता, हा सिद्धांत केवळ अभ्यासण्यापुरताच सांगितला गेलेला नसून दुष्ट आणि दु:खदायक अशा जन्म–मृत्यू–चक्रा (भवचक्र) तून मुक्त होण्यासाठी सांगितला गेलेला आहे. चेतना–प्रवाहाविषयी सम्यक–दृष्टि ठेऊन वारंवार जन्म होत असल्याचे निरीक्षणाअंती जाणून, त्यामुळे उत्पन्न दु:खातून मुक्त होण्यासाठीच आर्य–अष्टांगिक–मार्गाचे पालन करुन निर्वाण म्हणजे अंतिमा जाति। (अंतिम जन्म) प्राप्त कारण्यासाठीच पुनर्जन्माची वास्तविकता पटवून सांगितली गेली आहे.

पुनर्भव (पुनर्जन्म)

१. प्रास्ताविक

१. मृत्यूनंतर काय होते ? हा प्रश्न वारंवार विचारला जातो.
२. भगवान बुद्धाच्या समकालीनांमध्ये ह्याविषयी दोन भिन्न मते होती. पहिले मत शाश्वततावाद आणि दुसरे मत म्हणजे उच्छेदवाद.
३. आत्मा अमर असल्यामुळे जीवन शाश्वत आहे. पुनर्जन्माने जीवन पुढे चालू राहते असे शाश्वततावादी मानीत असत.
४. मृत्यू म्हणजे सर्वनाश, मृत्युनंतर काही उरत नाही, हा उच्छेदवाद्यांचा सिद्धांत.
५. भगवान बुद्ध हा शाश्वततावादी नव्हता. कारण शाश्वततावादात पृथक आणि अमर अशा आत्म्याचे अस्तित्व कल्पावे लागते आणि त्यास तर बुद्धाचा विरोध होता.

६. भगवान बुद्ध हा उच्छेदवादी होता काय ? आत्म्याचे अस्तित्व मानीत नसल्याने, बुद्ध हा स्वाभाविकत: उच्छेदवादी असेल अशी अपेक्षा असणार.
७. परंतु आपण वस्तुत: उच्छेदवादी नसता आपणावर तसा आरोप केला जातो अशी बुद्धाने अलगद्दूप्पम्म सुत्तात तक्रार केली आहे.
८. तो म्हणतो माझी शिकवण वेगळी असता, काही श्रमण आणि ब्राह्मण चुकीने आणि अप्रामाणिकपणाने वस्तुस्थिती धाब्यावर बसवून मी उच्छेदवादी आहे आणि मानवजातीचे विघटन, विनाश आणि संपुर्ण उच्छेद होणार आहे असे शिकवितो, असा मजवर आरोप करतात.
९. खरोखर मी तसे शिकवित नाही आणि तरी सुद्धा हे भले लोक चुकीने किंवा अप्रामाणिकपणाने मजवर खोटा आरोप करुन मला उच्छेदवादी बनवू पाहतात !
१०. हे विधान जर खरोखर बुद्धाचे असेल, बुध्द धम्मावर ब्राह्मणी सिद्धांत लादण्यासाठी घुसडलेले प्रक्षिप्त विधान नसेल तर एक गंभीर समस्या उभी राहते – (ती समस्या अशी) :
११. भगवान बुद्ध तर आत्म्याचे स्वतंत्र अस्तित्व मानीत नाही, मग तो आपण उच्छेदवादी नाही असे कसे म्हणू शकतो ?
१२. यातुन एक प्रश्न उद्‌भवतो तो असा की भगवान बुद्ध पुनर्जन्म मानतो काय ?

२. पुनर्जन्म कशाचा

१. भगवान बुद्ध पुनर्जन्म मानतो काय ?
२. याचे उत्तर होय असे आहे.
३. या प्रश्नाचे दोन भाग पाडणे योग्य ठरेल : (अ) पुनर्जन्म कोणत्या वस्तुचा आणि (आ) पुनर्जन्म कोणत्या व्यक्तीचा ?
४. या दोन प्रश्नांचा एकेक प्रश्न वेगळा घेऊन विचार करणे बरे पडेल.
५. पुनर्जन्म कशाचा ? या प्रश्नाचा प्रथम विचार करु या.
६. या प्रश्नाकडे बहुधा दुर्लक्ष केले जाते. हे दोन्ही प्रश्न एकत्र केल्यामुळेच अतिशय वैचारीक गोंधळ उत्पन्न झालेला आहे.
७. भगवान बुद्धाच्या मते माणसाच्या अस्तित्वाचे चार घटक पदार्थ आहेत: (अ) पृथ्वी, (आ) आप, (इ) तेज, (ई) वायु.
८. प्रश्न असा आहे की मनुष्यदेह मृत झाल्यावर त्याच्या या चार भौतिक घटकांचे काय होते ? मृत शरीराबरोबर तेही मृत होतात काय ? काही लोक म्हणतात, होय
९. भगवान बुद्ध म्हणतो – नाही, ते घटक पदार्थ आकाशात जे समान पदार्थ सामुहीक रुपाने आहेत त्यात मिळुन जातात.
१०. जेव्हा हे चार घटक आकाशात तरंगणाऱ्या समुहाला *(Mass)* मिळतात तेव्हा एक नवा जन्म घडतो.
११. पुनर्जन्माचा भगवान बुद्धाला अभिप्रेत असणारा अर्थ असा आहे.
१२. या नव्या जन्मातील घटक पुर्वीच्या एका विशिष्ट मृत शरीरातील असु शकतील.
१३. इथे एक गोष्ट लक्षात ठेवली पाहीजे की शरीर मरते पण त्याचे भौतिक घटक पदार्थ सदैव जगत राहतात.
१४. अशा प्रकारचा पुनर्जन्म बुद्ध मानतो.
१५. सारीपुत्त आणि महाकोठ्ठित्त यांच्या संवादात या विषयावर चांगलाच प्रकाश पडला आहे.
१६. असे म्हणतात की, एकदा भगवान श्रावस्ती येथील अनाथपिंडकाच्या जेतवन आरामात वस्ती करीत असता महाकोठ्ठित्त आपले सायंकाळचे ध्यान संपवुन सारीपुत्ताकडे गेला आणि त्याने सारीपुत्ताला आपल्या मनात डाचत असलेल्या काही प्रश्नांचे स्पष्टीकरण विचारले.
१७. खालील प्रश्न त्यांपैकी होते.
१८. महाकोठ्ठित्त :– ध्यानाच्या पाहिल्या अवस्थेत किती गोष्टी दुर केल्या जातात आणि किती मागे राखल्या जातात ?
१९. सारीपुत्त :– पाच दुर केल्या जातात; पाच मागे राखल्या जातात. विषय–वासना, दुर्बुद्धी, आळस, चिंता आणि शंका या दुर केल्या जातात आणि निरीक्षण, चिंतन, उत्साह, समाधान आणि चित्ताची एकाग्रता ह्या मागे राखल्या जातात.
२०. महाकोठ्ठित्त :– डोळे, कान, नाक, जिव्हा आणि स्पर्श ही पंचेन्द्रिये घ्या. त्यांचे विषय पृथकआणि क्षेत्रे पृथकआहेत. त्यांचा विचार करु लागलो असता असा प्रश्न पडतो की, त्यांचे अंतिम आधिष्ठान कोणते ? या पंचेन्द्रियांचे विषय आणि त्यांचे क्षेत्रे यांचा उपभोक्ता कोण ?
२१. सारीपुत्त :– मन.
२२. महाकोठ्ठित्त :– ही पंचेन्द्रिये कशावर अवलंबून आहेत ?
२३. सारीपुत्त :– चेतनेवर *(Vitality).*
२४. महाकोठ्ठित्त :– चेतना कशावर अवलंबून असते ?
२५. सारीपुत्त :– उष्णतेवर.
२६. महाकोठ्ठित्त :– उष्णता कशावर अवलंबून असते ?
२७. सारीपुत्त :– चेतनेवर.
२८. महाकोठ्ठित्त :– तुम्ही म्हणता उष्णता चेतनेवर अवलंबून असते व चेतना उष्णतेवर अवलंबून असते, याचा खरोखर अर्थ तरी काय लावायचा ?
२९. सारीपुत्त :– मी तुला एक उदाहरण देउन स्पष्ट करतो. ज्याप्रमाणे दिव्यातील प्रकाश ज्योतीचे दर्शन घडवितो आणि ज्योतीमुळे प्रकाश उद्‌भवतो, त्याप्रमाणेच चेतना ही उष्णतेवर आणि उष्णता चेतनेवर अशी ती दोन्हीही तत्वे अन्योन्यश्रयी आहेत.
३०. महाकोठ्ठित्त :– <u>शरीर हे निश्चेतन काष्ठासारखे दुर फेकण्यापुर्वी शरीरातील कोणत्या गोष्टी त्यास सोडुन जातात ?</u>
३१. सारीपुत्त :– <u>चेतना, उष्णता आणि विज्ञान (जाणीव).</u>
३२. महाकोठ्ठित्त :– इंद्रिय संज्ञा आणि भाव–भावना ज्या भिक्खुने आपल्या समाधीत निग्रहित आणि शांत केल्या आहेत तो भिक्खु आणि मृत शरीर या दोहोंमध्ये भेद काय ?

३३. सारीपुत्त :– मृत शारीरात काया, वाचा आणि मन ह्यांच्याच क्रिया केवल थांबलेल्या असतात तर इंद्रियांचे सामर्थ्यही उच्छिन्न झालेले असते. उलटपक्षी, ध्यानस्थ भिक्खुमध्ये चेतना व उष्णता ही कायम असुन इंद्रियशक्ती शाबुत असते जरी त्याचे श्वासोच्छ्वास, वितर्क–विचार आणि संज्ञा थांबलेल्या आणि शांत असल्या तरी.

३४. मृत्यु अथवा उच्छेद यांचे हे श्रेष्ठ आणि परिपुर्ण विवेचन ठरण्याचा संभव आहे.

३५. या संवादात एक व्यंग आहे. महाकोष्ठित्ताने सारीपुत्ताला एक प्रश्न विचारावयाला हवा होता, तो म्हणजे उष्णता म्हणजे काय ?

३६. याचे सारीपुत्ताने काय उत्तर दिले असते याची कल्पना करणे सोपे नाही. एक गोष्ट मात्र नि:स्संदेह आहे की, उष्णता म्हणजे शक्ती *(Energy).*

३७. अशा रीतीने स्पष्ट केल्यास शरीर मृत झाल्यावर काय होते ? या प्रश्नाचे योग्य उत्तर शरीर शक्ती *(Energy)* उत्पन्न करण्याचे थांबविते असे होते.

३८. परंतू हाही उत्तराचा एकच भाग ठरतो. कारण मृत्यूचा एक अर्थ असाही आहे की, शरीरातून जी शक्ती बाहेर पडते ती विश्वात संचार करणाऱ्या शक्तीसमुहात मिळून जाते.

३९. म्हणून मृत्यूचे अथवा उच्छेदाचे दोन अर्थ आहेत. एका पैलूचा अर्थ शक्तीचे *(Energy)* उत्पादन थांबणे. दुसऱ्या पैलूचा अर्थ विश्वात संचार करणाऱ्या शक्तीसंग्रहात नवी भर पडणे.

४०. उच्छेद या शब्दाच्या अर्थाला असे दोन पैलू पडत असल्याने बुद्ध स्वत:ला पूर्णतया उच्छेदवादी म्हणत नसे. आत्म्याच्या कक्षेपर्यंत तो उच्छेदवादी होता. शरीराच्या भौतिक घटका *(Matter)* बाबत मात्र तो उच्छेदवादी नव्हता.

४१. असा अर्थ लावला तर बुद्ध स्वत:ला उच्छेवादी का म्हणवून घेत नसे हे कळणे सोपे होते. तो शरीर घटकांचे *(Matter)* पुनर्जीवन मानतो; तो आत्म्याचा पुनर्जन्म मानत नाही.

४२. भगवान बुद्धाच्या मताचा असा अर्थ लावला तर तो शास्त्राशी सुसंवादी आहे.

४३. याच अर्थाने बुद्ध केवळ पुनर्जन्म मानतो असे म्हणता येईल.

४४. शास्त्र म्हणते, शक्ती ***(Energy)*** कधीही नाश पावत नाही. मृत्युनंतर सर्व उच्छेद होतो आणि मागे काहीच उरत नाही ही विचारसरणी भौतिक शास्त्राविरूद्ध आहे. कारण ही विचारसरणी शक्तीचे ***(Energy)*** सामुहिक सातत्य या प्रमाणाशी जुळत नाही.

४५. केवळ याच रीतीने वर सांगितलेली पुनर्जन्माची समस्या सोडविता येते.

३. पुनर्जन्म कोणाचा ?

१. सर्वात बिकट प्रश्न म्हणजे पुनर्जन्म कोणाचा ?

२. एखादा मृत झालेला मनुष्य परत नवा जन्म घेतो का ?

३. या सिद्धांतावर बुद्धाचा विश्वास होता काय ? असणे असंभाव्य दिसते.

४. मृत मनुष्याचे सर्व भौतिक अंश एकत्र येऊन, त्यांनी एक नवा देह बनविला तरच त्या मनुष्याचा पुनर्जन्म घडणे शक्य आहे.

५. जर नवा देह वेगवेगळ्या मृत मनुष्यांच्या भिन्न भौतिक अशांच्या मिश्रणांनी बनत असला तर पुनर्जन्म शक्य आहे. परंतु तो त्या एकाच मृत मनुष्याचा पुनर्जन्म असु शकत नाही.

६. भिक्खुणी खेमा हिने हा मुद्दा पसेनदी राजाला चांगलाच स्पष्ट करुन सांगितला आहे.

७. एकदा तथागत श्रावस्तीजवळील अनाथपिंडकाच्या जेतवनारामात राहत होते.

८. त्या समयी कोशल जनपदात परिभ्रमण करुन खेमा (भिक्खुणी) ही श्रावस्ती आणि साकेत ह्या नगराच्या दरम्यान असलेल्या तोरणवस्थुमध्ये राहत होती.

९. या वेळी कोसल राजा पसेनदी साकेतहून श्रावस्ती येथे जात होता. एक रात्र तो तोरणवत्थु येथे राहीला.

१०. राजा पसेनदीने एका माणसाला बोलावून सांगीतले, हे बघ ! सन्माननीय अशा एखाद्या भिक्खुला किंवा ब्राह्मणाला घेऊन ये !

११. ठिक आहे, असे बोलून तो तोरणवत्थूत राजसन्मानास योग्य असा भिक्खु अथवा ब्राह्मण शोधु लागला; परंतु तसा कोणीही त्याला आढळला नाही.

१२. शेवटी तोरणवत्थूमध्ये रहावयास आलेली भिक्खुणी खेमा त्याला दिसली. तिला भेटून तो कोसलराज पसेनदीकडे गेला आणि म्हणाला.

१३. महाराज, आपल्या सन्मानास योग्य असा भिक्खु अथवा ब्राह्मण येथे कोणी दिसत नाही. परंतु येथे खेमा नावाची तथागतांची एक शिष्या आहे. तिच्या संबंधी अशी वार्ता प्रसृत आहे की, ती विचारसंपन्न, विचक्षण, बहुश्रुत, वादविवादात कुशल आणि प्रत्युत्पन्नमतीची अशी अर्हत स्त्री आहे. महाराजांनी तिचा सन्मान केल्यास तो योग्यच होईल.

१४. हे ऐकल्यावर कोसलराज पसेनदी भिक्खुणी खेमाला भेटण्यास गेला. तिच्या समीप गेल्यावर तिला अभिवादन करुन तो बाजुला बसला आणि म्हणाला,

१५. या विषयासंबंधी आपले म्हणणे काय आहे ? मृत्यूत्तर तथागताचे अस्तित्व राहते काय ?

१६. महाराज, हे गुढ तथागतांनी स्पष्ट केलेले नाही.

१७. तथागतांचे मृत्युनंतर अस्तित्व राहते काय ? असा प्रश्न विचारला असता त्याचे उत्तर तथागतांनी सांगीतले नाही असे म्हणतात व दुसऱ्या प्रश्नाचीही.... तशीच उत्तरे देतात. तथागतांनी हे गुढ उकलून न सांगण्याचे काय कारण असावे बरे ?

१८. महाराज, या बाबतीत मी आपणालाच एक प्रश्न विचारीन आणि आपणास योग्य वाटेल तसे त्याचे उत्तर द्या. महाराज, आपणाजवळ असा कोणी गणिती आहे काय की जो गंगेतील वाळू कणांची शेकड्यांनी, हजारांनी अथवा लक्षांनी गणती करु शकेल ?

१९. नाही, तसा कोणीच नाही.

२०. मग तुमच्याजवळ असा कोणी गणिती आहे काय की जो समुद्रात इतके करोड, इतके हजार, इतके लाख माप पाणी आहे हे सांगू शकेल ?

२१. नाही, असा कोणीच नाही.

२२. असे का ?

२३. कारण समुद्र खोल, अमर्याद, अगाध आहे.

२४. त्याप्रमाणे महाराज, तथागतांनी देह परित्यक्त केल्यावर ते मुळापासुन छेदलेल्या तालवृक्षासारखे परत पुन्हा उगवणार नाहीत. तथागतांच्या देहासंबधी काय सांगता येईल? तथागत शरीर विमुक्त झाल्यावर समुद्रासारखेच अमर्यादी आणि अगाध आहेत. अशा स्थितीत तथागतांना मृत्युनंतर अस्तित्व आहे अथवा नाही किंवा आहे आणि नाही असे कोणतेही विधान लागू शकत नाही.

२५. तथागतांची त्यांच्या वेदनांवरुन व्याख्या करु गेल्यास त्या वेदना तथागतांनी परित्यक्त केलेल्या आहेत. आमुलाग्र नाहीशा केलेल्या आहेत. वेदना विमुक्त असे तथागत, थोर समुद्राप्रमाणे अमर्याद आणि अगाध आहेत. तेव्हा मृत्युनंतर तथागतांचे अस्तित्व राहते अथवा राहत नाही; किंवा राहते आणि राहत नाही, ही विधाने तथागतांना लागु पडत नाहीत.

२६. त्याप्रमाणेच संज्ञा, संस्कार, विज्ञान यांच्या आधारे तथागतांची व्याख्या करु लागल्यास तीही त्यांना लागू पडत नाही. कारण या सर्वांपासून समूळ विमुक्त झालेले तथागत हे थोर समुद्रासारखे अमर्याद आणि अगाध आहेत. तेव्हा मृत्युनंतर तथागतांच्या अस्तित्वासंबधी अथवा अनस्तित्वासंबंधी विधान त्यांना लागू पडत नाही.

२७. खेमा (भिक्खुणी) चे हे शब्द ऐकून कोसल राजा पसेनदी आनंदित झाला. आपल्या जागेवरुन उठला, तिला नमस्कार केला आणि तो निघून गेला.

२८. दुसऱ्या एका प्रसंगी राजा पसेनदी तथागतांकडे गेला असता त्यांना अभिवादन करुन त्याने विचारले,

२९. भगवान, मग तथागतांना मृत्यूत्तर अस्तित्व नाही असे म्हणता येईल काय?

३०. महाराजा, यासंबंधी मी काहीच म्हटलेले नाही.

३१. भगवान, मग तथागतांना मृत्युत्तर अस्तित्व आहे असे म्हणता येईल काय ?

३२. महाराज, मी तसेही म्हटलेले नाही.

३३. नंतर त्यांने खेमा (भिक्खुणी) ला विचारलेलेच दुसरे प्रश्न विचारले.

३४ भगवान, मी जेव्हा आपणाला विचारतो, मृत्युत्तर तथागतांना अस्तित्व आहे काय अथवा नाही काय, तर आपण म्हणता, मी ते सांगितलेलेच नाही. तर भगवान, ह्या न सांगण्याचे कारण काय?

३५. महाराजा, मी आता तुला एक प्रश्न विचारतो आणि तुला योग्य वाटेल तसे उत्तर दे. त्या ठिकाणी भगवंतांनी खेमा (भिक्खुणी) सारखेच राजा पसेनदीला प्रश्न विचारले.

३६. भगवान, ही खरोखर आश्चर्याची गोष्ट आहे की गुरुशिष्यांनी दिलेली उत्तरे अर्थश: आणि अक्षरश: समान, सुसंवादी, सुसंगत आणि उच्चतम आहेत.

३७. भगवान, एका समयी मी भिक्खुणी खेमाकडे गेलो होतो आणि तिला याच गोष्टीसंबंधी विचारले होते आणि भगवंतासारखेच तिने अक्षरश: उत्तर दिले.

३८. भगवान, आम्ही कामाची माणसे. आम्हांला पुष्कळ कामे आहेत. आम्ही जातो.

३९. जा, या वेळी जे तुला करणे उचित आहे ते कर.

४०. या शब्दांनी आनंदित होऊन भगवांतांना अभिवादन करुन कोसल राजा पसेनदी आपल्या मार्गाला लागला. (भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म, चतुर्थ खंड, भाग दुसरा, प्रकरण– पुनर्जन्म)

बाबासाहेबांनी भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म या ग्रंथात बुद्धधम्मातील पुनर्जन्माविषयी संक्षेपाने दिलेली माहीती पुर्णत: वरील प्रमाणे जशीच्या तशी दिलेली आहे. वरील चर्चेतून आलेले ''तथागतांचे महापरिनिर्वाणानंतर अस्तित्व आहे किंवा नाही, याविषयी तथागतांनी काहीच म्हटलेले नाही '' हे वक्तव्य वाचून वाचकाच्या मनात गैरसमज उत्पन्न होतो आणि तो मनात अशी धारणा करुन घेतो की, ''येथे मृत्यूनंतर पुन्हा जन्म नाही.'' म्हणूनच ङ्गपुनर्जन्म कोणाचा? ङ्घ या प्रश्नाचे उत्तर अजुनही अनुत्तरीत आणि अपुर्णच राहीलेले आहे. पुनर्जन्म कोणाचा ? या विषयी वरील प्रमाणे आलेली माहीती भगवान बुद्धांबद्दल सांगितली गेलेली आहे, सर्वसामान्य माणसाविषयी नाही. आपण हा उतारा पुन्हा एकदा काळजीपुर्वक वाचावा...''... २४.... महाराज, तथागतांनी देह परित्यक्त केल्यावर ते मुळापासुन छेदलेल्या तालवृक्षासारखे परत पुन्हा उगवणार नाहीत. तथागतांच्या देहासंबधी काय सांगता येईल ? तथागत शरीर (रुप) विमुक्त झाल्यावर समुद्रासारखेच अमर्याद आणि अगाध आहेत. अशा स्थितीत तथागतांना मृत्युनंतर अस्तित्व आहे अथवा नाही किंवा आहे आणि नाही असे कोणतेही विधान लागू शकत नाही.

२५. तथागतांची त्यांच्या वेदनांवरुन व्याख्या करु गेल्यास त्या वेदना तथागतांनी परित्यक्त केलेल्या आहेत. आमुलाग्र नाहीशा केलेल्या आहेत. वेदना विमुक्त असे तथागत, थोर समुद्राप्रमाणे अमर्याद आणि अगाध आहेत. तेव्हा मृत्युनंतर तथागतांचे अस्तित्व राहते अथवा राहत नाही; किंवा राहते आणि राहत नाही, ही विधाने तथागतांना लागु पडत नाहीत.

२६. त्याप्रमाणे संज्ञा, संस्कार, विज्ञान यांच्या आधारे तथागतांची व्याख्या करु लागल्यास तीही त्यांना लागु पडत नाही. कारण या सर्वांपासुन समुळ विमुक्त झालेले तथागत हे थोर समुद्रासारखे अमर्याद आणि अगाध आहेत. तेव्हा मृत्युनंतर तथागतांच्या अस्तित्वासंबधी अथवा अनस्तित्वासंबंधी विधान त्यांना लागु पडत नाही.''

भगवान बुद्ध, अर्हत यांना त्यांच्या पंचस्कंधा (रुप, वेदना, संज्ञा, संस्कार आणि विज्ञान) प्रती कसलीही आसक्ती शिल्लक नसते तसेच त्यांच्या मनात लोभ, द्वेष आणि मोह (अविद्या) सुद्धा शिल्लक नसते. ते सर्व प्रकारच्या मानसिक विकारांपासून आणि कर्मबंधनापासून पुर्णत: विमुक्त झालेले असतात. त्यांनी निर्वाणाचा, अन्तिमा जाति । म्हणजे शेवटच्या जन्माचा लाभ करुन घेतलेला असतो. या अर्थाने त्यांचा पुन्हा जन्म होत नाही आणि म्हणूनच त्यांचे मुत्युनंतर अस्तित्व राहते किंवा नाही... या प्रश्नाचे स्पष्टीकरण देण्याची त्यांना आवश्यकता नसते. तर या उलट, त्यांच्या विषयी काय ज्यांना अजुनही त्यांच्या पंचस्कंधाप्रती आसक्ती कायम आहे, त्यांच्या मनात लोभ, द्वेष आणि मोह घर करुन बसलेला आहे, ते त्यांच्या सर्व प्रकारच्या मानसिक विकारांपासून आणि कर्मबंधनापासून पुर्णत: विमुक्त झालेले नाहीत, ते मृत्यूनंतर पुन्हा जन्म घेणार नाहीत काय? आणि या प्रश्नाचे उत्तर आहे, होय, ते मृत्युनंतर पुन्हा जरुर जन्म घेतील. हे आपण भगवान बुद्धाने पुज्य भिक्षु आनंद यांना सांगितलेल्या भवसुत्ताच्या आधारे पाहू शकतो. हे सुत्त पुनर्जन्म व त्याच्या कारणाविषयी संक्षेपाने पण परिपुर्ण रुपाने माहीती देणारे आहेत, ते अशाप्रकारे–

प्रथम भवसुत्त

एकेवेळी आयुष्यमान आनंद भगवान जेथे होते तेथे जाऊन भगवंताला अभिवादन करुन एका बाजूला स्थानापन्न झालेत. एका बाजूला बसलेल्या आयुष्यमान आनंद यांनी भगवंताला असे म्हटले –

'' भंते ! 'भव', 'भव' असे म्हटले जाते, काय झाल्यामुळे (कोणत्या कारणाने) भव (उत्पन्न) होत असते ?''

'' आनंद ! जर कामधातू (च्या कर्माचा) विपाक झाला नाही तर काम–भव दिसेल का ?''

'' भंते ! नाही.''

'' म्हणूनच आनन्द ! कर्म क्षेत्र (शेत) आहे, विज्ञान बीज आहे, तृष्णा जल आहे. अविद्या–नीवरण वाले आणि तृष्णा–संयोजन वाले प्राणी यांचे हीन (काम) धातुमध्ये विज्ञान स्थापित होत असते अशा प्रकारे भविष्यामध्ये पुनर्जन्म होत असतो, अशा प्रकारे आनन्द ! भव होत असते.''

'' आनन्द ! जर रुप धातू (च्या कर्माचा) विपाक झाला नाही तर रुप भव दिसेल का ?''

'' भंते ! नाही.''

'' म्हणूनच आनन्द ! कर्म क्षेत्र (शेत) आहे, विज्ञान बीज आहे, तृष्णा जल आहे. अविद्या–नीवरण वाले आणि तृष्णा–संयोजन वाले प्राणी यांचे मध्यम (रुप) धातुमध्ये विज्ञान स्थापित होत असते. अशा प्रकारे भविष्यामध्ये पुनर्जन्म होत असतो, अशा प्रकारे आनन्द ! भव होत असते.''

'' आनन्द ! जर अरुप धातू (च्या कर्माचा) विपाक झाला नाही तर अरूप भव दिसेल का ?''

'' भंते ! नाही.''

'' म्हणूनच आनन्द ! कर्म (शेत) क्षेत्र आहे, विज्ञान बीज आहे, तृष्णा जल आहे, अविद्या–नीवरण वाले तसेच तृष्णा–संयोजन वाले प्राणी यांचे श्रेष्ठ (अरुप) धातुमध्ये विज्ञान स्थापित होत असते. अशा प्रकारे भविष्यामध्ये पुनर्जन्म होत असतो, अशा प्रकारे आनन्द ! भव होत असते.''

द्वितीय भवसुत्त

एकेवेळी आयुष्यमान आनंद भगवान जेथे होते तेथे जाऊन भगवंताला अभिवादन करुन एका बाजूला स्थानापन्न झालेत. एका बाजूला बसलेल्या आयुष्यमान आनंद यांनी भगवंताला असे म्हटले –

'' भंते ! 'भव', 'भव' असे म्हटले जाते, काय झाल्यामुळे (कोणत्या कारणाने) भव (उत्पन्न) होत असते ?''

'' आनंद ! जर कामधातू (च्या कर्माचा) विपाक झाला नाही तर काम–भव दिसेल का ?''

'' भंते ! नाही.''

'' म्हणूनच आनन्द ! कर्म क्षेत्र (शेत) आहे, विज्ञान बीज आहे, तृष्णा जल आहे. अविद्या–नीवरण वाले आणि तृष्णा–संयोजन वाले प्राणी यांचे हीन (काम) धातुमध्ये कामना (तृष्णा) स्थापित होत असते. अशा प्रकारे भविष्यामध्ये पुनर्जन्म होत असतो, अशा प्रकारे आनन्द ! भव होत असते.''

'' आनन्द ! जर रुप धातू (च्या कर्माचा) विपाक झाला नाही तर रुप भव दिसेल का ?''

'' भंते ! नाही.''

'' म्हणूनच आनन्द ! कर्म क्षेत्र (शेत)आहे, विज्ञान बीज आहे तृष्णा जल आहे. अविद्या–नीवरण वाले आणि तृष्णा–संयोजन वाले प्राणी यांचे मध्यम (रुप) धातुमध्ये कामना (तृष्णा) स्थापित होत असते. अशा प्रकारे भविष्यामध्ये पुनर्जन्म होत असतो, अशा प्रकारे आनन्द ! भव होत असते.''

'' आनन्द ! जर अरुप धातू (च्या कर्माचा) विपाक झाला नाही तर अरूप भव दिसेल का ?''

'' भंते ! नाही.''

'' म्हणूनच आनन्द ! कर्म क्षेत्र आहे. विज्ञान बीज आहे, तृष्णा जल आहे, अविद्या–नीवरण वाले तसेच तृष्णा–संयोजन वाले प्राणी यांचे श्रेष्ठ (अरुप) धातुमध्ये कामना (तृष्णा) स्थापित होत असते. अशा प्रकारे भविष्यामध्ये पुनर्जन्म होत असतो, अशा प्रकारे आनन्द ! भव होत असते.'' (अङ्गुत्तर–निकाय, तिक निपात, आनंद वग्ग)

भवसुत्त आपण वाचले आहे. हाच आशय व्यक्त करणारी चर्चा मी येथे देत आहे. ही चर्चा पूज्य अर्हत भिक्षु नागसेन स्थविर आणि राजा मिलिंद यांच्यात झालेली आहे, ती अशाप्रकारे –

जन्म मृत्यू विषयी प्रश्न

राजा म्हणाला, '' भंते नागसेन, अशीही कोणी व्यक्ती आहे काय की जी मृत्यूनंतर पुन्हा जन्म ग्रहण करीत नाही ?''

स्थविर म्हणाले, '' महाराज, काही व्यक्ती मृत्यूनंतर जन्मास येतात तर काही व्यक्ती असे आहेत की, पुन्हा जन्मास येत नाहीत.''

'' भंते, कोण जन्मास येतात आणि कोण जन्मास येत नाहीत.''

'' ज्यांचे चित्तमळ (क्लेश) अवशिष्ठ आहेत, अशांना पुन्हा जन्म घ्यावा लोगतो तर ज्यांचे चित्तमळ नाश पावलेत त्यांना जन्म घ्यावा लागत नाही.''

'' भंते, आपण पुन्हा जन्मास येणार की नाही ?''

'' महाराज, जर सांसरिक आसक्ती मनात कायम राहील, तर जन्म घ्यावा लागेल आणि जर माझे चित्त आसक्ती पासून मूक्त झाले, तर जन्म घ्यावा लागणार नाही.''

'' भंते, फारच छान!''

नागसेनाच्या पुनर्जन्मासंबंधी प्रश्न

राजा म्हणाला, '' भंते, तुम्ही स्वत: पुन्हा जन्मास याल की नाही ?''

'' महाराज, पुरे करा. असे विचारण्याचे काय कारण ? मी तर आधीच सांगितले आहे की, माझ्या मनात लालसा शिल्लक राहून मला मृत्यू आला तर पुन्हा

जन्मास येईन; परंतु जर का लालसा (तृष्णा) शिल्लक न राहता मृत्यू आला तर मी पुन्हा जन्मास येणार नाही.''

'' भंते, एखादे उदाहरण देऊन स्पष्ट करा.''

''महाराज, एखाद्याने अगदी विश्वासपूर्वक व ईमानेईतबारे राजाची नोकरी केली. यावर खुष होऊन त्यास राजाने मोठे पद दिले. त्याचा पगार वाढवून इतर सुखसोयी प्रदान केल्या. त्यामूळे तो ऐशआरामात व चैनित राहू लागला, परंतू तो मात्र जाहीररित्या लोकांना सांगू लागला की, राजाने माझ्यासाठी काहीच केले नाही. तर त्याचे असे बोलणे संयुक्तिक ठरेल काय?''

''मुळीच नाही, भंते !''

''महाराज, याचप्रमाणे तोच तो प्रश्न पुन्हा विचारण्यात काय स्वारस्य? याबाबत मी आधीच सांगितले ना की, माझ्या मनात लालसा शिल्लक असताना मृत्यू आला तर पुन्हा जन्मास येईन आणि मनातील लालसा सर्वस्वी नष्ट होऊन मृत्यू आला तर पुन्हा जन्मास येणार नाही.''

''भंते, फारच छान.'' (मिलिंद प्रश्न)

वरील माहीती बुद्धधम्मातील पुनर्जन्म सिद्धांताला स्पष्ट करण्यासाठी पुरेशी आहे. एवढ्यानेच आपणास खरी समज उत्पन्न होऊ शकते. पुनर्जन्माचे कारणच आपल्या मनातील भव–तुष्णा (पुन्हा जन्म होण्याचे कारण) हे आहे. तुष्णा किंवा लालसा मनात ठेऊन जर आपण मरण पावलो तर आपला नक्कीच पुन्हा जन्म होईल. परंतु तो जन्म पुर्वी जसा होता अगदी तसाच होणार नाही किंवा त्याहून पुर्णत: निराळाही होणार नाही. चेतना प्रवाहातील सातत्य तत्वांच्या परिवर्तनासोबत कायम राहील, ज्याला बुद्धधम्मात नाम–रुप म्हटले गेले आहे. रुप म्हणजे सारेच भौतिक पदार्थ, जसे – पृथ्वी, जल, तेज आणि वायू. यात भारीपण असून जागा (आकाश) व्यापण्याची क्षमता असते. नाम यात वेदना (अनुभव करणे), संज्ञा (माहीती प्राप्त करणे), संस्कार (चित्तात प्राप्त माहीती व अनुभव प्रतिबिंबीत होऊन राहणे) आणि विज्ञान (चित्त) या चार घटकांचा समावेश होतो. यात भारीपण किंवा जागा व्यापण्याची क्षमता नसते. याचाच अर्थ हा आहे की चेतना प्रवाह तोच राहील मात्र नाम–रुप बदललेले असेल. या संबंधीची उत्कृष्ट माहीती आपण पुज्य अर्हत भिक्षु नागसेन स्थविर आणि राजा मिलिंद यांच्या चर्चेतून खालीलप्रमाणे पाहू शकतो –

वस्तूच्या अस्तित्वाची प्रक्रिया

राजाने प्रश्न केला, ''भंते, जन्मास आलेली व्यक्ती तीच असते की बदलून भिन्न झालेली असते?''

स्थविर म्हणाले, ''न च सो, न च अञ्ञो ति । तो तोच नसतो तसेच अन्यही नसतो.''

(१) ''कृपा करुन उदाहरण देऊन समजावून सांगा.''

''महाराज, समजा, जेव्हा आपण अगदी लहान बालक होतात, निव्वळ मासाचा गोळा, इतके अजाण की, केवळ खाटेवर उताने पडून रहात होता. परंतु आता आपण मोठे झाला आहात, चांगले प्रौढ. तेव्हा आपण लहान असताना जी व्यक्ती होतात, तीच व्यक्ती आता प्रौढावस्थेत आहात असे अपणास वाटते काय?''

''नाही भंते, आता माझ्यात भिन्नत्व आले आहे.''

''महाराज, आपण जर बालपणी असलेली व्यक्ती प्रौढावस्थेत नसाल, तर मग कोणी आपले माता–पिता अगर आचार्यही नाहीत, असेच म्हणावे लागेल ! तसेच असेल तर कोणी ज्ञानी किंवा शीलवान देखील होऊ शकत नाही. आपल्या भिन्न भिन्न अवस्थांतील म्हणजे बाल्यावस्थेतील माता वेगळ्या आणि प्रौढावस्थेतील माता वेगळ्या मानाव्या लागतील. शिल्प शिकणारा दुसरा आणि शिल्प शिकून तयार झालेला दुसरा मानावा लागेल. गुन्हा करणारा दुसरा व शिक्षा भोगणारा दुसरा असेच समजावे लागेल.''

''तसे नाही भंते, पण यावरून आपण काय सिद्ध करू इच्छिता?''

स्थविर म्हणाले, ''महाराज, मी बालपणी वेगळा आणि सद्यस्थितीत वेगळा झालो आहे खरा, परंतु ह्या सर्व अवस्था या एकाच शरीरावर घडणाऱ्या असल्यामूळे एकाच व्यक्तीत समाविष्ट करण्यात आल्या आहेत.''

(२) ''भंते, उदाहरण देऊन सांगा.''

स्थविर म्हणाले, ''महाराज, समजा, एखाद्या माणसाने दिवा लावला, तर तो रात्रभर जळत राहील की नाही?''

''होय भंते, रात्रभर जळत राहील.''

''पण काय हो महाराज, रात्रीच्या पहिल्या प्रहरी दिव्याची जी ज्योत होती तीच दुसऱ्या व तिसऱ्या प्रहरी राहील का?''

''नाही भंते !''

''महाराज, तर काय पहिल्या प्रहरी असणारा दिवा दुसरा आणि दुसऱ्या व तिसऱ्या प्रहरी असणारा दिवा दुसरा होतो की काय?''

''नाही भंते, तोच दिवा रात्रभर जळत राहील.''

''महाराज, बरोबर त्याचप्रमाणे वस्तूच्या अस्तित्वाच्या प्रक्रियेत एक अवस्था उत्पन्न होत असतानाच पहिली अवस्था नष्ट होत असते व याप्रमाणे ही प्रक्रिया किंवा प्रवाह एकसारखा सुरू राहतो; या एका प्रवाहाच्या दोन अवस्थेत एका क्षणाचेही अंतर पडत नाही, कारण एका अवस्थेचा लय (नाश) होतो न होतो तोच दुसरी (अवस्था) उत्पन्न होऊन पहिलीची रिक्त जागा भरून काढते. यामूळे व्यक्ती एकच आहे असेही म्हणता येत नाही तसेच दुसरा होतो असेही म्हणता येत नाही. एका जन्मातील शेवटच्या विज्ञानाचा नाश होताच दुसऱ्या जन्माचे विज्ञान उठून उभे होते.''

(३) ''कृपा करून एक अजून उदाहरण देऊन सांगा.''

''महाराज, दूध काढल्यानंतर विरजन टाकले असता काही वेळाने त्याचे दही बनते. दह्यापासून लोणी व लोण्यापासून तूप बनविले जाते. तेव्हा कोणी म्हणेल की, दूध, दही, लोणी व तूप एकच आहे, तर असे म्हणणाराचे कथन मान्य करता येईल काय?''

''नाही भंते, परंतु दुधापासूनच दही, लोणी व तूप बनले आहे.''

''महाराज, बरोबर त्याचप्रमाणे वस्तूंच्या अस्तित्वाच्या प्रवाहात एक अवस्था उत्पन्न होते आणि तात्काळ दुसरी अवस्था उत्पन्न होऊन तीची रिक्त जागा भरून काढते. याप्रमाणे हा अतुट प्रवाह सतत चालू राहतो. जणू काही पुनर्जन्माचे कार्य एकाचवेळी चालू आहे. मात्र एका प्रवाहाच्या दोन अवस्थेत एका क्षणाचेही अंतर पडत नाही कारण एकाचा लय (नाश) होताच दुसरा उत्पन्न होतो. या कारणानेच तोच जीव राहतो असेही म्हणता येत नाही आणि उत्पन्न होणारा दुसरा आहे असेही म्हणता येत नाही. एका जन्माच्या शेवटच्या विज्ञानाचा लय होताच दुसऱ्या जन्माचे प्रथम विज्ञान उठून उभे राहते.''

''भंते, आपले कथन अगदी संयुक्तिक आहे.''(मिलिंद प्रश्न)

परिवर्तनातही व्यक्तीमत्वाचे सुरक्षित अस्तित्व

राजा म्हणाला, ''भंते पुर्नजन्म कोणाचा होतो?''

स्थविर म्हणाले, ''महाराज नाम (चित्त) आणि रुप (द्रव्य–समुच्चय) यांचा पुर्नजन्म होतो.''

''भंते, हेच नाम आणि रुप जन्मास येते काय?''

''महाराज, हेच नाम आणि रुप जन्मास येत नाहीत. मनुष्यात समाविष्ट या नाम व रुपाकडून चांगली (पुण्यमय) अगर वाईट (पापमय) कृत्ये केली जातात. त्या कर्मफळानुसार दुसरे नाम आणि रुप जन्म ग्रहण करते.''

''भंते, असे असेल तर, पहिले नाम–रुप आपल्या कर्मफळातून मुक्त झाले, असेच म्हणावे लागेल.''

स्थविर म्हणाले, ''महाराज, जर पुन्हा जन्मास येणार नसेल तर मागील कर्मफळातून मुक्त झाले; परंतू ते पुन्हा जन्मास येते यावरून हाच निष्कर्ष निघतो की, तो मुक्त झाला नाही.''

''भंते उदाहरण देऊन समझावून सांगा.''

(५)''महाराज, कोणा एका मनुष्याने गवळ्याकडून घडाभर दूध घेतले आणि ते तेथेच सुरश्रित ठेऊन उद्याला परत येताना घेऊन जाईन असे बोलून निघून गेला. इकडे त्या दुधाचे रात्रभरात दही बनले. दुसऱ्या दिवशी परत आल्यानंतर त्याने गवळ्याला दुधाने भरलेला घडा मागितला, गवळ्याने त्याचे मडके आणून दिले. परंतु मडक्यातील दही पाहून तो म्हणाला, 'मला दही नाही दुधाचा घडा दे' यावर गवळी म्हणाला, 'त्याच दुधाचे हे दही बनले आहे.'''

''महाराज, या प्रमाणे दोघेही भांडन करीत निर्णयासाठी तुमच्याकडे आले असता तुम्ही कोणत्या बाजूने निर्णय द्याल?''

''भंते, गवळ्याच्या बाजूने''

''ते का बरे?''

''भंते, तो काहीही म्हणत असला तरी त्याच दुधाचे दही झाले आहे.''

''महाराज, याचप्रमाणे एका नाम–रूपाचा लय होऊन त्यातूनच दुसऱ्या नाम–रूपाचा पुनर्जन्म होतो. म्हणजे दुसरे नाम–रूप हे पहिल्या नाम–रूपाच्या परिणामापासून उत्पन्न होते, म्हणून पहिल्या नाम–रूपाच्या कर्मफळापासून दुसऱ्या नाम–रूपाची मुक्तता होत नाही.''

''भंते, आपण उत्तम रीतीने पटवून दिले.''(मिलिंद प्रश्न)

पुनर्भवाच्या या प्रकियेतील गुंतागुतीला समजुन घेताना एक प्रश्न उत्पन्न होतो की, मृत्युनंतर दुसरीकडे पुन्हा जन्म घेण्यासाठी वेळेचे बंधन आहे की नाही? या प्रश्नाचे उत्तर मिलिंद प्रश्नात अशा प्रकारे आले आहे.

मृत्युनंतर दुसरीकडे पुन्हा जन्म घेण्यासाठी वेळेचे बंधन नाही

राजा म्हणाला, ''भंते, असे समजा की, एक मनुष्य येथे मरण पावला व ब्रह्मलोकात पुन्हा जन्मास आला आणि दुसरा मनुष्य येथे मरण पावला व काश्मीरात पुन्हा जन्मास आला, तर दोघांपैकी आधी कोण बरं जन्मास येईल ?''

''महाराज, दोघेही एकाच वेळी जन्मास येतील.''

१) ''कृपाकरुन उदाहरणाने स्पष्ट करुन सांगावे.''

''महाराज, तुमचा जन्म कोणत्या गावी झाला?''

''भंते, अलसंद द्वीपात कलसी नावाचे एक शहर आहे, तेथे माझा जन्म झाला.''

''येथुन कलसी शहर किती दुर आहे ?''

''अंदाजे दोनशे योजन भंते !''

''ठीक आहे, आता काश्मीर येथुन किती दुर आहे हे सांगा ?''

''केवळ बारा योजन.''

''महाराज, आता तुम्ही कलसी शहरासंबंधी स्मरण करावे.''

''भंते, स्मरण केले.''

''आणि आता काश्मीरचे सुद्धा स्मरण करावे.''

''भंते, स्मरण केले.''

''महाराज, मग आता सांगा की, या दोन स्थळांपैकी कोणत्या स्थळाचा विचार आधी आला?''

''भंते, दोन्ही स्थळाचे स्मरण करावयास सारखाच अवधी लावला. यांत कमी–जास्त असे काही नाही.''

''महाराज, या उदाहरणावरुन समजुन घ्यावयास पाहीजे की, येथे मृत्यु पावल्यानंतर ब्रह्मलोकात पुन्हा जन्म घ्यावा लागला काय किंवा काश्मीर अगर कोठेही जन्म घ्यावा लागला काय, तरी सारखाच वेळ लागतो.''

२) ''कृपाकरुन पुन: उदाहरण देऊन सांगावे.''

''महाराज, समजा दोन पक्षी आकाशात उडत आहेत. त्यांपैकी एक पक्षी उंच झाडावर बराला आणि दुसरा पक्षी लहान झुडपावर बसला तर या दोहोंपैकी कोणत्या पक्षाची सावली जमीनीवर आधी पडेल ?''

''भंते, दोन्ही पक्ष्यांची सावली सारख्याच वेळाने जमीनीवर पडेल.''

''महाराज, याप्रमाणे जर कोणी येथे मृत्यू पावला व ब्रह्मालोकात पुन्हा जन्मास आला आणि कोणी दुसरा येथे मुत्यू पावला व काश्मीरात पुन्हा जन्मास आला, तरी या दोघांचाही मृत्यू वेळ सारखीच असेल.''

''भंते, आपण फारच योग्य पद्धतीचे समजावुन सांगितले.''(मिलिंद प्रश्न)

थोडक्यात जीवितिन्द्रिय, उष्मा (तेजोधातु) आणि विज्ञान (चित्त) जेव्हा सत्वांच्या बाहेर पडते त्यालाच मृत्यु म्हणतात. मृत्युच्या क्षणी उष्मेच्या आधाराने विज्ञानाच्या बाहेर पडण्यालाच च्युति–चित्त म्हणतात. हेच च्युति चित्त जेव्हा नविन जन्म धारण करते तेव्हा त्याला प्रतिसंधि चित्त किंवा प्रतिसन्धि ग्रहण करणे म्हणतात. जन्माबद्दल भगवान बुद्ध महातण्हासंखय सुत्तात (म. नि.) सांगतात की, माता ऋतूमती असेल, माता–पित्याचा संवास होत असेल आणि गंधर्व उपस्थित असेल तरच गर्भधारणा होते. या जागी आलेला गंधर्व हा शब्द प्रतिसंधि–चित्ताला व्यक्त करणारा आहे. या प्रक्रियेत च्युति चित्त, भवंग चित्त आणि प्रतिसंधि चित्त या तिन्ही चित्ताचा अंतर्भाव होतो.

मृत्युनंतर लगेच येणाऱ्या जन्मालाच त्या सत्वाचा पुनर्जन्म झाला असे म्हटले जाते. ही प्रक्रिया कशी पार पडते याचे थोडे स्पष्टीकरण अशा प्रकारे करता येईल. सत्वाचा होणारा जन्म अविद्या, तृष्णा आणि कर्माच्या आधाराने निश्चित होत असतो. मृत्युच्या क्षणात च्युति–चित्त कसे उत्पन्न होते यावर त्याचा येणारा जन्म अवलंबुन असतो. मृत्युच्या क्षणी कर्म, कर्म निमित्त आणि गति निमित्त कुशल–मुल आहेत की अकुशल–मुल आहेत यानुसारच त्या सत्वाला सत्वनिकाय किंवा काया प्राप्त होत असते. भगवान भिक्षु आनंदाला उपदेश करताना – पठम भव सुत्त व दुतिय भव सुत्तात सांगतात की, ज्याची चेतना वा विज्ञान कामलोकात प्रतिष्ठित झाले असेल तर त्याचा जन्म कामलोकात होतो, ज्याची चेतना वा विज्ञान रुपलोकात प्रतिष्ठित झाले असेल तर त्याच्या जन्म रुपलोकात होतो आणि त्याची चेतना वा विज्ञान अरुपलोकात प्रतिष्ठित झाले असेल तर त्याचा जन्म अरुप लोकात होत असतो. मृत्युच्या क्षणी चित्त जे आलम्बन ग्रहण करते तेच आलम्बन त्याच्या जन्माचे कारण असते, यालाच चित्ताचे प्रतिष्ठित होणे म्हणतात. पुनर्भवाच्या प्रक्रियेला अगदिच स्पष्टपणे खालील उदाहरणातून समजुन घेता येते. मी या ठीकाणी पुनर्जन्म कशाप्रकारे होतो याचे एक उदाहरण देणार आहे. यातून आपण पुनर्जन्माचे कारण ओळखू शकतो तसेच पंचस्कंधाच्या (तत्वांच्या) परिवर्तनाची प्रक्रीयाही चांगल्याप्रकारे जाणून घेऊ शकतो. बुद्धधम्मात पंच–उपादान–स्कंधांना लक्षात घेतले जाते, सत्वांच्या भौतिक कायेला नाही कारण पंच–उपादान–स्कंध हेच दु:ख आहे. पंचस्कंधाप्रती असलेली आसक्ती आणि कर्मबंधन हेच पुनर्जन्माचे कारण आहे. आणि ही प्रक्रीया कार्य–कारण–भाव (प्रतित्य समुत्पाद) व अनित्यतेच्या वैश्विक नियमाने परिचालीत आहे.

खालील कथा धम्मपद अट्ठकथेतून (मलवग्ग) घेतलेली असून पूज्य भिक्षु तिस्स स्थविर यांच्याशी संबधीत आहे, ती अशाप्रकारे –

ज्याचे पाप त्यालाच नष्ट करते

अयसा व मलं सुट्ठितं... ही धम्मदेसना भगवंतांनी जेतवनात विहार करीत असताना तिस्स स्थविरांना उद्देशून दिलेली आहे.

तिस्स स्थविरांचे चीवर : श्रावस्ती वासीय कोणी तरूण सांसारिक जीवनाचा त्याग करून प्रवज्जा व उपसम्पदा प्राप्त करून तिस्स (स्थविर) नावाने ओळखला जाऊ लागला. पूढे चालून कोण्या एका गावात वर्षावास करीत असताना त्यांना आठ हात लांब सूती कापड दान मिळाले. त्यांनी ते वस्त्र परत येऊन आपल्या बहिणीकडे सुरक्षित ठेवण्यासाठी दिले. बहिणीने वस्त्र पाहून – ' हे वस्त्र माझ्या भावाला अनुरूप नाही' असा विचार करून कैचीने ते वस्त्र फाडून, त्याचे तुकडे करून, त्याला ऊखळात कुटून त्याचे महीन सुत कातून त्यापासून नऊ हात लांब कापड तयार केले. इकडे स्थविरांनी सुई, इत्यादीची व्यवस्था करून, युवक श्रामणेरांना एकत्र करून बहिणीकडे जाऊन बहिणीला म्हटले, 'माझे वस्त्र मला परत दे, मी त्याचे चीवर बनविणार आहे.' बहिणीने नऊ हात लांब नविन वस्त्र भावाकडे सुपूर्त केले. त्याला पाहून स्थविरांनी म्हटले, 'माझे कापड आठ हात लांब असून खडबडीत होते आणि हे कापड नऊ हात लांब असून मुलायम आहे, हे माझे कापड नाही, तुझेच आहे. मला माझे कापड परत दे !' असे म्हणून स्थविराने ते कापड घेण्याचे नाकारले. पण बहिणीने सर्व वृत्तांत कथन केल्यानंतर त्यांनी ते वस्त्र ग्रहण केले आणि त्यापासून सुंदर चीवर तयार केले.

तिस्स (स्थविरांची) वस्त्र–कीटकाच्या रुपात उत्पत्ति : तेव्हा त्यांच्या बहिणीने चीवरकार श्रामणेरांसाठी यागु आणि भात तयार केला आणि एका विशेष दिवशी त्यांच्या सत्कार समारंभाची व्यवस्था सुद्धा केली. स्थविरांनी जेव्हा चीवर पहिले तेव्हा त्यांना त्याप्रती आसक्ती उत्पन्न झाली आणि 'उद्या मी याला घालणार 'असा निश्चय करून त्यांनी त्यास एका बांबुवर टांगून ठेवले. परंतु त्या रात्री त्यांचे भोजन व्यवस्थित न पचल्याने उदरशूल उत्पन्न होऊन त्यांचे देहावसान झाले आणि त्यांनी वस्त्रातील किटकाच्या रूपात जन्म धारण केला. त्यांच्या मृत्यूची बातमी ऐकून त्यांची बहिण भिक्षूंच्या चरणावर मस्तक ठेऊन मोठमोठ्याने रडू लागली, क्रंदन करु लागली. भिक्षुंनी त्यांचे दैहिक–कर्म (अंतिम संस्कार) पार पाडल्यानंतर त्यांच्या चीवराच्या संदर्भात विचार करण्याचे ठरवले कारण रोग्याचे परिचारक नसल्यास त्या चीवराचा संघच उत्तराधिकारी असतो म्हणून ते त्या चीवरास आपल्या अधिकाराखाली घेऊ लागले. हे पाहून तो वस्त्रातील कीडा दु:खी–कष्टी होऊन ओरडू लागला की, 'हे लोक माझ्या चीवराचे अपहरण करीत आहेत ' आणि इकडे तिकडे व्याकूळ होऊन सरपटू लागला. शास्त्याने गन्धकुटीत विराजमान असतानाच आपल्या दिव्य–श्रोत्रधातूने त्या किटकाचे हे क्रंदन ऐकून संपुर्ण घटना जाणून घेतली आणि (भिक्षु) आनंदाला आदेश दिला – 'आनंद ! त्या भिक्षुंना जाऊन सांग की, या चीवराचे एका आठवड्याच्या नंतर वाटप करा, आत्ताच नाही.' आनंद स्थविरांनी या आदेशाचे पालन त्यांच्याकडून करवून घेतले. तेव्हा सात दिवसानंतर तो कीडा मरण पावला आणि तुषित देवता लोकात उत्पन्न झाला. त्यानंतर आठव्या दिवशी शास्त्याने त्या चीवराचे विभाजन करण्याचे सांगितले व भिक्षूंनी त्या आदेशाचे पालन केले.

धर्मसभेत चर्चा : भिक्षूंनी धर्मसभेत आपसात चर्चा करणे आरंभ केले की, 'शास्त्याने तिस्स स्थविरांच्या चीवराविषयी सात दिवस थांबून आठव्या दिवशी त्याचे विभाजन करावे, असे का सांगितले असेल ?' भगवान त्या धर्मसभेत आले आणि त्यांच्या शंकेचे समाधान करताना म्हणाले – 'भिक्षूंनो ! तिस्स स्थविराने वस्त्राप्रती आसक्ती ठेवल्यामूळे ते मरणोत्तर वस्त्रातील कीडा बनून उत्पन्न झाले होते. तुम्ही जेव्हा त्या वस्त्राचे विभाजन करीत होता तेव्हा ते त्याला (वस्त्रकिटकाला) त्याच्या वस्त्राचे अपहरण वाटत होते. जर तुम्ही ज्यावेळी त्याच्या वस्त्राचे विभाजन केले असते तर त्याला तुमच्या प्रती द्वेषभाव उत्पन्न झाला असता आणि यामूळे तो नरकात उत्पन्न झाला असता. त्यामूळेच मी ते चीवराचे विभाजन थांबविले होते. आता तो येथून च्यूत होऊन तुषित लोकात उत्पन्न झालेला आहे. म्हणूनच मी या समयी चीवराचे विभाजन करण्याची आज्ञा दिली.' भिक्षुंनी म्हटले– 'भन्ते ! तृष्णा खरोखरच फार भारी (जिंकण्यास कठीण) असते .' भगवान म्हणाले, 'होय भिक्षुंनो ! सर्वच प्राणिमात्रांसाठी तृष्णेचा परित्याग करणे फारच कठीण असते. ज्याप्रकारे लोखंडाचा मोर्चा लोखंडातून उत्पन्न होऊन त्यालाच खाऊन टाकते, त्यालाच नष्ट करून टाकते, त्याला वापरण्यायोग्य ठेवत नाही; त्याचप्रमाणे ही तृष्णा प्राणिमात्रांच्या मनातच उत्पन्न होऊन त्यांना नरकात उत्पन्न होण्यासाठी प्रवृत्त करीत असते, त्यांना विनष्ट करीत असते.' असे म्हणून गाथेच्या रूपाने शास्त्याने असा उपदेश दिला–

अयसा व मलं समुट्ठितं, तदुट्ठाय तमेव वादति ।
एवं अतिधोनचारिनं सककम्मानि नयान्ति दुग्गतिं ।।

– लोखंडातून उत्पन्न मोर्चा लोखंडातून उत्पन्न होऊन त्यालाच नष्ट करते त्याचप्रमाणे अति चंञ्चल माणसाचे त्याचे स्वत:चेच कर्म त्याला दुर्गतीला घेऊन जातात.(धम्मपद अट्ठकथा मलवग्गो – ३. तिस्सस्थविरकथा (गाथा–२४०)

वरील प्रमाणे आलेल्या पूज्य तिस्स स्थविर यांच्या कथेतून पुनर्जन्म कोणाचा होतो याचे योग्य विश्लेषण आपण पाहू शकतो. जेथे पुनर्जन्माचे कारण आहे तेथे मरणाऱ्याच्या च्युतिविज्ञानात म्हणजे शेवटच्या चित्तक्षणात जी विषयासक्ती किंवा स्कंधाप्रतीची आसक्ती असते त्यानुसार पुनर्जन्म होत असतो. परंतु जेथे पुनर्जन्माचे कारण शिल्लक नसते तेथे पुनर्जन्म होत नाही.

पुनर्जन्म कोणाचा? या विषयी भारतात जी समस्या किंवा चर्चा निर्माण झालेली आहे ती हिंदूधर्मातून उत्पन्न आहे कारण हिंदूधर्म शरीराहून भिन्न अशा आत्म्याचे अस्तित्व मान्य करुन तो आत्मा मुत्यूनंतर एका शरीरातून दुसऱ्या शरीरात प्रवेश किंवा संसरण करतो असे मानतो. आपण हे भगवद्गीतेत स्पष्टपणे पाहू शकतो, ते अशाप्रकारे –

"हे पार्था अर्जुना ! आत्मा हा अविनाशी, जन्मरहीत, नित्य आणि कधीही न बदलणारा आहे असे जो जाणतो तो पुरुष कोणाला कसा मारील किंवा कोणाला कसा मारवील."

"ज्याप्रमाणे मनुष्य जुनी वस्त्रे टाकून नवी वस्त्रे धारण करतो, त्याप्रमाणे जीवात्मा जुनी आणि निरुपयोगी झालेली शरीरे टाकून देऊन नवी भौतिक शरीरे धारण करतो."(श्रीमद्भगवद्गीता जशी आहे तशी, अध्याय दुसरा, श्लोक – २१–२२)

परंतु बुद्धधम्मातील पुनर्जन्म सिद्धांत मृत्यूनंतर आत्मा एका शरीरातून दुसऱ्या शरीरात प्रवेश करतो किंवा संसरण करतो या सिद्धांताशी समरुप नसून वरील प्रमाणे सांगितलेल्या पूज्य तिस्स स्थविराच्या कथेनुसार प्रतित्य समुत्पाद किंवा कार्य कारण भावाच्या वैश्विक नियमावर आधारीत आहे. पुनर्जन्म कोणाचा? या विषयी जो गोंधळ निर्माण झालेला आहे त्याविषयी स्वत: बाबासाहेबांनीच त्यांच्या भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म या ग्रंथात स्पष्टीकरण दिलेले आहे, ते खालील प्रमाणे –

आत्म्याचा एका देहातुन दुसऱ्या देहात प्रवेश (संसरण)

१. भगवान बुद्धाने पुनर्जन्म प्रवचिला आहे; परंतु त्याने आत्म्याचे संसरण (एका देहातून दुसऱ्या देहात प्रवेश) प्रवचिले नाही.
२. भगवान बुद्धानी दोन परस्परविरोधी सिद्धांतांचे प्रवचन केले, असे त्यांच्यावर दोषारोपण करणारे काही कमी लोक नव्हते.
३. असे टीकाकार प्रश्न करीत की,"संसरणाशिवाय पुनर्जन्म कसा शक्य आहे?"
४. ते म्हणत, "आणि इथे तर संसरणाशिवाय पुनर्जन्माची गोष्ट केली आहे. हे संभवनीय तरी आहे काय ?"
५. (परंतु बुद्धाच्या सिद्धांतात) परस्परविरोधी असे काही नाही. संसरणाशिवाय पुनर्जन्म शक्य आहे.
६. हे सर्व नागसेनाने राजा मिलिंदाला दिलेल्या उत्तरात चांगल्या प्रकारे स्पष्ट होते.
७. बैक्ट्रियाचा राजा मिलिंद याने नागसेनाला विचारले, "भगवान बुद्ध संसरण मानीत होते काय ?"
८. नागसेनाने उत्तर दिले, "होय."
९. "ह्यामध्ये परस्परविरोध नाही काय ?"
१०. नागसेन : "नाही."
११. "आत्म्याशिवाय पुनर्जन्म संभवनीय आहे काय ?"
१२. नागसेन : "अर्थात; निश्चित शक्य आहे."
१३. "हे कसे शक्य आहे, हे समजावुन सांगा बरे?"
१४. "नागसेन, जिथे संसरण नाही तिथे पुनर्जन्म कसा शक्य आहे?" राजाने विचारले.
१५. "हो शक्य आहे."
१६. "कसे शक्य आहे हे उदाहरणाने स्पष्ट करा."
१७ "राजा, समज, माणसाने एक दिवा दुसऱ्या दिव्याने पेटवला तर असे म्हणता येईल काय की, पहिल्या दिव्याने दुसऱ्या जागी संसरण केले?"

१८. “अर्थात नाही.”

१९. “राजा, त्याच प्रमाणे संसरणाविना पुनर्जन्म शक्य आहे.”

२०. “ह्याची अधिक उदाहरणे देऊन स्पष्ट करा बरे.”

२१. “बालपणी आपल्या गुरुपासुन शिकलेली एखादी कविता, हे राजा तुला आठवते काय ?”

२२. “होय, आठवते !”

२३. “तर मग त्या कवितेचे गुरुमुखापासुन संसरण होऊन ती तुमच्या मुखात आली काय ?”

२४. “अर्थात नाही.”

२५. “या प्रमाणेच संसरणाविना पुनर्जन्म होतो.”

२६. “वा, छान ! नागसेन !”

२७. “नागसेन, आत्मा अशी काही चिज आहे काय ?”

२८. “यथार्थ दृष्टीने पाहीले असता, राजा, आत्मा अशी काही चिज नाही.”

२९. “वा, छान ! नागसेन !” (भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म, खंड ४, भाग २, प्रकरण ४)

आत्मा आणि पुनर्जन्म तत्वाचे टिकाकार

१. भगवान बुद्धांनी सांगितले की, आत्मा नाही. त्यांनी सांगितले की, पुनर्जन्म आहे.

२. ज्यांना भगवान बुद्धांच्या ह्या दोन तत्वांची शिकवण परस्परविरोधी वाटली असे टीकाकार कमी नव्हते.

३. ते म्हणाले, जर आत्मा नसेल तर पुनर्जन्म कसा असू शकेल ?

४. ह्यात परस्परविरोध नाही. आत्मा नसला तरी पुनर्जन्म असू शकतो.

५. आंब्याची कोय असते. कोयीतुन आंब्याचा वृक्ष निर्माण होतो. आंब्याच्या वृक्षाला आंब्याची फळे येतात.

६. हा आंब्याचा पुनर्जन्म आहे.

७. पण इथे आत्म्याचे अस्तित्व नाही.

८. म्हणजे आत्मा नसला तरी पुनर्जन्म असू शकतो. (भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म, खंड ६, भाग ३)

वरील माहीती पुनर्जन्माविषयी योग्य समज देईल अशी आशा आहे. बुद्धधम्मात पुनर्जन्म म्हणजे आत्म्याचे (मृत्युनंतर) संसरण होणे नसून पंच–उपादान–स्कंधाचे प्रतित्य समुत्पाद या वैश्विक *(The Universal Law Of Cause and Effect)* नियमानुसार उत्पन्न होणे *(Grouping)*, नष्ट होणे *(Dissolution)* व पुन्हा उत्पन्न होणे *(Re-grouping)* होय.

येथे एक प्रश्न विचारला जाऊ शकतो की, मृत्युनंतर पुन्हा जन्म होतो या सिद्धांतावर विश्वास ठेऊन सामान्य माणसाला काय फायदा होणार आहे ? या प्रश्नाचे उत्तर आपण आपले जीवन कोणत्या आशयाने समजून घेतो यावर अवलंबून आहे. जर आपण जन्म हेच आपल्या म्हारारपण, मरण, शोक, परिदेव (क्रंदन), दु:ख (शारीरिक पिडा), दौर्मनस्य (मानसिक पिडा), उपायास (निराशा) म्हणजेच आपल्या जीवनातील सर्वच दु:ख समुहाचे कारण असल्याचे समजून घेत असू तर आपण नक्कीच पुन्हा जन्म घडवून आणणाऱ्या कारणाचा निरोध करण्यासाठी प्रयत्न करु शकतो. आणि या लोकी व परलोकीही पुण्यसंचयामुळे सुखी राहू शकतो. परंतू आपणास असे वाटत नसेल तर आपण भगवान बुद्धाने उपदेशिलेल्या धम्माचे आपल्या जीवनातील दु:ख नष्ट करण्यासाठी पालन करु किंवा त्याला या आशयाने समजून घेऊ, अशी आशाच करता येत नाही. भगवान बुद्धाने त्यांचा धम्म या लोकी व परलोकी सुद्धा सुखी होण्यासाठी तसेच निर्वाण (अंतिमा जाति म्हणजे शेवटचा जन्म) प्राप्त करण्यासाठी, जन्म–मरणाच्या भवसंसरणातून मुक्त होण्यासाठी उपदेशिलेला आहे. ज्याच्या मनात पापभिरुता आहे तो नक्कीच भविष्यात सुखी होऊ शकतो परंतु ज्याच्या मनात पापभिरुता नाही तो भविष्यात सुखी होण्यासाठी काही काळजी घेईल ही आशा करता येत नाही. जीवन प्रवाह कार्य कारण भावाच्या वैश्विक नियमानुसार पुढे सरकत राहतो माणसाच्या वाटण्यानुसार किंवा मान्यतेनुसार नाही. आपण पुनर्जन्मावर विश्वास ठेवतो की नाही हा भाग महत्वाचा नसुन दु:खातून मुक्त होण्यासाठी आपण आर्य अष्टांगिक मार्गाचे किती काटेकोरपणे पालन करतो हे जास्त महत्वाचे आहे. जर पुनर्जन्माचे कारण आपल्या मनात शिल्लक राहीले तर कर्माच्या आधाराने पुन्हा जन्म घेण्यापासून आपण स्वत:चा कोणत्याच उपायाने बचाव करुन घेऊ शकत नाही. सत्वाच्या मनात जोपर्यंत भवतृष्णा कायम आहे तोपर्यंत त्याचे पुन्हा पुन्हा जन्म घेणे थांबणार नाही. आणि हेच वास्तव आहे, याला मान्य करा अथवा करू नका.

शेवटी येथे मी भगवान बुद्धाने उपदेशिलेले एक बुद्धवचन देत आहे ज्यात पुनर्जन्म आणि निर्वाणाविषयीची परिपुर्ण पण संक्षिप्त माहीती दिलेली आहे. ती अशाप्रकारे –

गब्भमेके उपज्जन्ति, निरयं पापकम्मिनो ।
सग्गं सुगतिनो यन्ति, परिनिब्बन्ति अनासवो ।।

– काही गर्भात जन्म घेतात; तर पापकर्म करणारे नरकात उत्पन्न होतात. पुण्यकर्म करणारे सुगती प्राप्त करतात आणि जे अनाश्रव आहेत ते परिनिवृत्त होतात, निर्वाण प्राप्त करतात. (धम्मपद, पापवग्गो, गाथा – १२६)

*****